सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करणे या योजनेसाठी निधी वितरीत करण्याबाबत..
(लेखाशिर्ष- २४०१ ए८०६)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९ / प्र.क्र.०७ / कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ जुलै, २०१९.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९ /प्र.क्र.४४ / अर्थ-३, दि.०१.०४.२०१९.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९ /प्र.क्र.९२ / अर्थ-३, दि.०८.०७.२०१९.
३) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. आपयो-२०१९ / प्र. क्र.१२१ / ९-अे.

**शासन निर्णय-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करणे या योजनेसाठी मागणी क्र. टी-५, २४०१, पिक संवर्धन, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१ (३२) आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करणे, लेखाशिर्ष (२४०१ ए८०६), ३३, अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. २४.०० लाख इतका निधी सन २०१९-२० या वर्षासाठी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. यानुषंगाने कृषी विभागाच्या संदर्भीत क्र.३ येथील प्रस्तावास अनुसरुन आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करणे, लेखाशिर्ष (२४०१ ए८०६), ३३, अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली ६०% मर्यादेत रु.१४.४० लाख ( **रुपये चौदा लाख चाळीस हजार फक्त)** इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव (कृषी), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ व २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२३११०९२८८३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a912962 05b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf7282 55a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2019.07.23 16:21:28 +05'30'

किरण कि.पवार
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव ( कृषि ) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त( कृषि) , महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई